क्र.साप्रवि/रवका/न.क्र.५/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

# प्रशासकीय परिपत्रक क्र. १३० दिनांक ०२ / ११ /२००७

विषय : महावितरण कंपनीच्या खेळाडू/कलाकार इ.कर्मचाऱ्यांना स्पर्धेसाठी दौऱ्यावर असताना द्यावयाचा दैनिक पूरक भत्ता सुधारित करणेबाबत.

संदर्भ : पूर्वीच्या म.रा.वि.मंडळाचे प्रशासकीय परिपत्रक क्र.१५२ दि.२६.९.१९९५

.....

संदर्भिय प्रशासकीय परिपत्रकान्वये पूर्वीच्या म.रा.वि.मंडळातील खेळाडू/कलाकार इ.कर्मचाऱ्यांना स्पर्धेसाठी दौऱ्यावर असताना रु.५०/- प्रतिदिन या दराने दैनिक पुरक भत्ता देण्याबाबतच्या सूचना प्रसृत करण्यात आल्या होत्या. मात्र महावितरण कंपनीतील खेळाडू/कलाकार इ.कर्मचारी दैनिक पूरक भत्त्याच्या दरामध्ये वाढ करण्यासाठी सातत्याने मागणी करीत असल्याने सदर दैनिक पूरक भत्त्याच्या दरामध्ये वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव प्रशासनाच्या विचाराधीन होता.

२. याबाबत सर्वंकष विचारांती व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (संचलन) व संचालक (वित्त) यांच्याशी विचारविनिमय करुन महावितरण कंपनीच्या खेळाडू/कलाकार व इतर संबंधित कर्मचारी यांना क्रीडास्पर्धा किंवा नाटयस्पर्धा यासाठी दौऱ्यावर असताना **रु.१३०/- (एकशे तीस) प्रतिदिन** अशा वाढीव दराने दैनिक पूरक भत्ता देण्यासाठी मंजुरी दिली आहे.

३. दैनिक पूरक भत्त्याचे वाढीव दर सदर प्रशासकीय परिपत्रक निर्गमित झाल्याच्या तारखेपासून अंमलात येतील.

४. सदर प्रशासकीय परिपत्रक म.रा.वि. वितरण कं. मर्यादितच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

(सु.य.पाटील)
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रत,
महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे.

*K/Adm.Cir.F.N.5*